




दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज

• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955

बीड – महाराष्ट्र । शनिवार दि. ०९ मे २०२६ । वर्ष ६ वे । अंक ५० । पाने ४ । पान १ । किंमत ३ रूपये








RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://epaper.marathwadapatra.com | E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com







# महाराष्ट्र बोर्डाचा दहावीचा निकाल जाहीर

## ९२.०९ टक्के लागला निकाल!

## यंदाही मुलींनीच मारली बाजी

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रुवारी मार्च मध्ये घेतलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर केलाय. दुपारी एक वाजता ऑनलाईन पद्धतीने पाहता येणार आहे. राज्यातील २३ हजार ६८३ शाळांमधून एकूण १६ लाख १५ हजार ४८९ विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेसाठी नोंदणी केली होती.

- कोकण विभागाचा ९७.८२ टक्के
- छ. संभाजीनगर चा निकाल ८८.४१ टक्के




- मुलींची टक्केवारी ९४.९६ टक्के
- मुलांची टक्केवारी: ९०.५६ टक्के

- पुणे - ९४.२४ टक्के
- नागपूर- ८९.०७ टक्के
- मुंबई - ९४.९७
- कोल्हापूर - ९५.४७
- अमरावती - ९०.५०
- नाशिक ९०.५३
- लातूर - ८८.४२
- कोकण - ९७.८२

● ४,३१,१६४ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण, ३,८०,४३७ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण, १,३४,१३४ विद्यार्थी तृतीय श्रेणीत उत्तीर्ण. राज्यातील २३,६१२ माध्यमिक शाळांनी नियमित विद्यार्थ्यांची नोंदणी केली त्यापैकी १५,५५,०२६ विद्यार्थ्यांची नोंदणी झाली होती. राज्यातील ६,६१२ शाळांचा निकाल शंभर टक्के लागला. मार्च २०२३, मार्च २०२४ आणि फेब्रुवारी–मार्च २०२६ परीक्षांतील नियमित विद्यार्थ्यांच्या निकालात वाढ झाली.






# जिल्हाधिकारी अविनाश पाठकला सात दिवसांची पोलीस कोठडी




**बीड । प्रतिनिधी**

धुळे–सोलापूर राष्ट्रीय महामार्गाच्या भूसंपादनातील वाढीव मोबदल्याच्या प्रकरणात तब्बल २४१ कोटी ६२ लाख रुपयांच्या कथित घोटाळ्याने राज्यभर खळबळ उडाली आहे. या प्रकरणात तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक याला बीड पोलिसांनी अटक करून न्यायालयात हजर केले. जिल्हा न्यायाधीश एस. आर. शिंदे यांनी त्यांना सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. या प्रकरणात भूसंपादनासाठी देण्यात आलेल्या वाढीव मोबदल्यातील सुमारे ७२ कोटी रुपयांच्या अपहाराचा आरोप आहे. बीडच्या शिवाजी नगर पोलीस ठाण्यात या संदर्भात दहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपासादरम्यान वाढीव मोबदल्याच्या आदेशांवरील स्वाक्षऱ्यांची पडताळणी करण्यात आली होती. त्यानंतर पोलिसांनी लातूर येथून अविनाश पाठकला ▶▶ उर्वरित पान २ वर

## बाप लेकीच्या नात्याला काळीमा, बापानेच केला दोन्ही मुलींवर अत्याचार

**मुंबई । प्रतिनिधी**

बाप लेकीच्या नात्याला काळीमा फासणारी धक्कादायक घटना डोंबिवलीत घडली आहे. बापानेच आपल्या मुलींवर अत्याचार केल्याचा प्रकार समोर आला आहे. दोन्ही मुलींवर अत्याचार केला असल्याचे तक्रारीत नोंद करण्यात आले आहे. मुलींवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या नराधम बापाला मानपाडा पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. डोंबिवलीत मुलींवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या नराधम बापाला मानपाडा पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. बाप हा ४३ वर्षे वयाचा असून तक्रारदार पिडीता ही १९ वर्षाची आहे. नराधम बाप गेल्या चार वर्षांपासून तिच्यावर लैंगिक अत्याचार करत असून तीच्या लहान बहिणीसोबत देखील त्याने शारीरीक संबंध केल्याचे पिडीतीने तक्रारीत म्हंटले आहे. पिडीतेने मानपाडा पोलिस ठाणे गाठत तक्रार दाखल करताच नराधम बापाला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. त्यांच्याविरोधात पोक्सो अंतर्गत लैंगिक अत्याचाराच्या आरोपाखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पैसे खाली पडल्याचा बहाणा करुन दुचाकीला अडकविलेली रोकड असलेली बॅग लांबविली

**केज । प्रतिनिधी**

बँकेतून पैसे काढून ते एका टिफीन बॅग मध्ये ठेवून ती बॅग मोटार सायकलीच्या हँडलला अडकवून घरी जात असलेल्या एका शिक्षकाला अनोळखी व्यक्तीने पैसे खाली पडल्याचे सांगून ते खाली उतरताच पाठीमागून आलेल्या अनोळखी इसमाने मोटार सायकलीला अडकवलेली १ लाख ५५ हजार रु.ची बॅग पळवून नेली आहे. भरदिवसा झालेल्या चोरीमुळे लोकांच्या मध्ये भीतीचे वातावरण पसरले ▶▶ उर्वरित पान २ वर

## मंदिरासमोर लघुशंका करु नको म्हणताच, दारुड्याने अंगावर पेट्रोल टाकून केली मारहाण

**केज । प्रतिनिधी**

मंदिरा समोर त्याच्या पुढे लघुशंका करण्यास मज्जाव केल्याने दारुड्याने एकाला जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण करून त्यांच्या अंगावर पेट्रोल टाकून जीवे मारण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चिंचपूर ता. केज येथील भगवान किसन समुद्रे हे दि. ६ मे रोजी दुपारी ४:०० वाजण्याचे सुमारास चिंचपुर येथील मारोती मंदिरा समोर बसलेले असताना त्याच्या गावातील जावई शिवाजी चयनु मुंढे (रा. कोरेगाव, ता. केज) जि.बीड, हा धारुर रोडने गावात येत असतांना एका मंदिरा समोर लघवी करत होता. तो दारु पिलेला असल्याने भगवान समुद्रे हे त्याला चीतू मंदिरा समोर लघुशंका करु नको. असे म्हणाले. त्यावेळेस त्याने तु काय सरपंच आहेस काय? असे म्हणुन जातीवाचक शिविगाळ करुन चापटा बुक्याने मारहाण केली. तसेच त्याच्या हातातील बाटलीत असलेले पेट्रोल त्याने भगवान समुद्री यांच्या अंगावर टाकले. पेट्रोल डोळ्यात गेल्याने भगवान समुद्रे यांच्या डोळ्याला जखम झाली आहे. भगवान समुद्रे यांच्या तक्रारी वरून शिवाजी मुंडे ▶▶ उर्वरित पान २ वर

### डोकाडियांच्या घरात सापडलेलं औषध उंदीर मारण्याचं नव्हतंच...

## कलिंगड खाऊन मृत्यू प्रकरणात पुन्हा ट्विस्ट



**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईतील पायधूनी परिसरात डोकाडिया कुटुंबातील चारही सदस्यांचा संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना समोर आली होती. या प्रकरणी आत्तापर्यंतची सर्वात मोठी माहिती समोर आली आहे. काल उंदीर मारण्याच्या औषधाने चौघांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली होती. त्यानंतर आज या प्रकरणा संदर्भातील आणखी महत्वाची माहिती समोर आली आहे. डोकाडिया कुटुंबियांच्या घरातून सापडलेल उंदराच औषध हे उंदीर मारण्याचं ▶▶ उर्वरित पान २ वर

## लेक रिझल्ट दाखवायला आली, कमी गुण मिळाल्याने संतापलेल्या बापाने भिंतीवर डोके आदळून संपवलं!



● पुण्यातील बिबवेवाडी किंवा नजीकच्या परिसरात राहणाऱ्या एका मध्यमवर्गीय कुटुंबात ही हृदयद्रावक घटना घडली. उन्हाळी सुट्या लागण्यापूर्वी शाळेचा निकाल जाहीर झाला होता. संबंधित ९ वर्षीय मुलगी आपली मार्कशिट घेऊन घरी आली होती. मात्र, निकालात मिळालेले गुण पाहून वडील संतप्त झाले. रागाच्या भरात माणसाचा विवेक कसा नष्ट होतो, याचे हे जिवंत उदाहरण ठरले आहे. केवळ मार्कांच्या वादातून एका बापाने आपल्या चिमुरडीवर हल्ला केला, ज्याचा शेवट तिच्या मृत्यूत झाला.

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरातून एक अत्यंत धक्कादायक आणि माणुसकीला काळिमा फासणारी घटना समोर आली आहे. शिक्षणाचे माहेरघर मानल्या जाणाऱ्या पुण्यात एका बापाने आपल्या पोटच्या ९ वर्षांच्या मुलीची निर्घृण हत्या केली आहे. शाळेच्या मार्कशीटवरुन झालेल्या वादातून हे टोकाचे पाऊल उचलल्याचे प्राथमिक तपासात समोर आले असून, या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात पालकांकडून पाल्यांवर चांगल्या गुणांसाठी प्रचंड दबाव टाकला जातो. या घटनेतही वडिलांना आपल्या मुलीने परीक्षेत अव्वल गुण मिळवावेत अशी अपेक्षा होती. जेव्हा निकालात अपेक्षेपेक्षा कमी गुण दिसले, तेव्हा वडिलांचा संयम सुटला. सुरुवातीला शाब्दिक चकमक झाली आणि नंतर त्याचे रूपांतर शारीरिक हिंसेत झाले. ▶▶ उर्वरित पान २ वर






# टँकरच्या पुढच्या चाकाखाली नवरा मागच्या चाकाखाली बायको

## खेड- शिवापूर टोलनाक्याजवळ भीषण अपघात; पती-पत्नीचा जागेवर मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे–सातारा महामार्गावर अपघातांची मालिका थांबण्याचे नाव घेत नाहीये. शुक्रवारी दुपारी खेडशिवापूर टोल नाक्याजवळ एका भरधाव टँकरने दुचाकीला चिरडल्याने भीषण अपघात झाला. या दुर्दैवी घटनेत दुचाकीवर प्रवास करणाऱ्या पती–पत्नीचा जागीच मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे कुटुंबावर मोठा दुःखाचा डोंगर कोसळला आहे. समोर आलेल्या प्राथमिक माहितीनुसार, राजेंद्र बबन मोरे आणि सविता राजेंद्र



मोरे (रा. वारजे माळवाडी, पुणे) हे दाम्पत्य आपल्या दुचाकीवरून पुण्याच्या दिशेकडून साताऱ्याकडे निघाले होते. दुपारी खेडशिवापूर टोल नाक्याच्या परिसरात आले असताना, पाठीमागून येणाऱ्या एका वेगवान टँकरने त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, दोघेही दुचाकीवरून खाली पडले आणि टँकरच्या चाकाखाली आले अपघात झाल्यानंतर महामार्गावर बघ्यांची मोठी गर्दी जमली होती. टँकरच्या धडकेत मोरे दाम्पत्याचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच खेडशिवापूर येथील राजगड पोलीस ठाण्याचे पथक ▶▶ उर्वरित पान २ वर

## गेवराई शहरातील प्रभाग ११ मधील पोटनिवडणुकीचा कार्यक्रम अखेर जाहीर

**बीड । प्रतिनिधी**

गेवराईनगर परिषदेच्या प्रभाग क्रमांक ११ मधील पोटनिवडणूक जाहीर करण्यात आली आहे. राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम घोषित केला आहे. तब्बल पाच महिन्यांपासून प्रतिनिधीविना असलेल्या प्रभागातील नागरिकांना यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. दि. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) च्या उमेदवार दूरदाना बेगम सलीम फारुकी यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले होते. दोन सदस्यीय प्रभाग असल्याने महाराष्ट्र नगरपरिषदा अधिनियम १९६५ नुसार संपूर्ण प्रभागाची निवडणूक स्थगित करण्यात आली होती. त्यानंतर २ डिसेंबर २०२५ रोजी इतर सर्व प्रभागांमध्ये मतदान प्रक्रिया पार पडून नगरसेवक निवडून आले; मात्र प्रभाग क्रमांक ११ मधील निवडणूक दीर्घकाळ प्रलंबितच राहिली होती. प्रभागातील रस्ते, पाणीपुरवठा, गटार व्यवस्था, स्वच्छता व आरोग्य सुविधांचे प्रश्न प्रलंबित असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. दरम्यान, राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार दि. १८ मे ते २५ मे २०२६ या कालावधीत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. दि. २० जून २०२६ रोजी मतदान होणार असून दि. २३ जून रोजी मतमोजणी व निकाल जाहीर करण्यात येणार आहे.

# विश्वनिर्मितीपासून ते आजपर्यंतचा मानवाचा इतिहास

"डायनासोर युग आणि त्यांचा अंत"*

मागील प्रकरणात आपण समुद्रातून जमिनीवर जीवन कसे पसरले, वनस्पतींनी जमिनीवर पाय रोवले आणि प्राण्यांनी या नव्या वातावरणाशी जुळवून घेतले, हे पाहिले. या प्रक्रियेनंतर पृथ्वीवर विविध परिसंस्था तयार झाल्या, अन्नसाखळ्या निर्माण झाल्या आणि जैवविविधतेत मोठी वाढ झाली. या पार्श्वभूमीवर पृथ्वीच्या इतिहासातील एक अत्यंत भव्य आणि प्रभावशाली अध्याय सुरू झाला, तो म्हणजे डायनासोर युग.

सुमारे 252 दशलक्ष (25.2 कोटी) वर्षांपूर्वी पृथ्वीवर 'पर्मियन महाविनाश' (Permian Mass Extinction) घडला. हा पृथ्वीच्या इतिहासातील सर्वात मोठा महाविनाश होता, ज्यात सुमारे 90 टक्के प्रजाती नष्ट झाल्या. समुद्र आणि जमिनीवरील बहुतेक जीवन जवळजवळ संपुष्टात आले. मात्र, या प्रचंड विनाशानेच नव्या जीवनासाठी मोठी संधी निर्माण केली. जुन्या प्रजातींचे वर्चस्व संपले आणि उत्क्रांतीला नवीन मार्ग मिळाला.

याच पार्श्वभूमीवर सुमारे 230 दशलक्ष वर्षांपूर्वी Triassic काळात डायनासोरांचा उदय झाला. सुरुवातीला ते आकाराने लहान आणि इतर सरपटणाऱ्या प्राण्यांच्या तुलनेत कमी प्रभावी होते. पण त्यांच्या शरीररचनेत काही क्रांतिकारी वैशिष्ट्ये होती. त्यांचे पाय शरीराच्या खाली सरळ उभे राहत असल्याने ते अधिक वेगाने, स्थिरतेने आणि दूरपर्यंत फिरू शकत होते. त्यांची श्वसनप्रणाली आणि



चयापचय प्रक्रिया अधिक कार्यक्षम होती, ज्यामुळे त्यांना वेगवेगळ्या वातावरणात टिकण्याची क्षमता मिळाली.

सुमारे 201 दशलक्ष वर्षांपूर्वी Triassic-Jurassic महाविनाश झाला. या घटनेत अनेक प्रतिस्पर्धी प्राणी नष्ट झाले. या विनाशानंतर डायनासोरांना पृथ्वीवर अधिराज्य गाजवण्याची मोठी संधी मिळाली. Jurassic आणि Cretaceous काळात त्यांनी सर्व खंडांवर विस्तार केला. त्यावेळी पृथ्वीवरील एकच विशाल supercontinent Pangaea पूर्णपणे विभाजित होऊ लागला होता. वेगवेगळ्या भूभागांवर वेगवेगळ्या प्रकारचे डायनासोर विकसित झाले.

डायनासोर एकसारखे नव्हते. त्यांच्या हजारो जाती होत्या. काही विशाल शाकाहारी (herbivores), तर काही भयंकर मांसाहारी (carnivores) होते.

ब्रॅकिओसॉरस आणि डिप्लोडोकस सारखे प्रचंड शाकाहारी डायनासोर उंच झाडांची पाने खात असत. ते सुमारे 20-30 मीटर लांबीचे आणि 50-80 टन वजनाचे होते.

टायरॅनोसॉरस रेक्स हा अत्यंत शक्तिशाली मांसाहारी शिकारी होता. त्याचा जबडा आणि दात इतके मजबूत होते की तो मोठमोठ्या शिकारांचा सहज बंदोबस्त करू शकत असे.

काही डायनासोर लहान आणि चपळ होते. अलीकडील संशोधनानुसार अनेक थेरोपोड डायनासोर पिसे आणि पंख असलेले होते, ज्यामुळे ते वेगाने धावू शकत आणि शिकार करू शकत.

डायनासोरांच्या दीर्घ यशामागे अनेक कारणे होती. मजबूत शरीररचना, विविध वातावरणाशी जुळवून घेण्याची क्षमता, चांगला प्रजनन दर आणि जवळजवळ सर्व भूभाग व्यापण्याची क्षमता. त्यामुळे ते सुमारे 164 दशलक्ष वर्षे (230 ते 66 दशलक्ष वर्षांपूर्वी) पृथ्वीवर प्रमुख सजीव म्हणून टिकून राहिले.

या काळात इतर महत्त्वाचे विकासही घडत होते. लहान थेरोपोड डायनासोरांमधूनच पक्ष्यांचा उदय झाला. आर्किओप्टेरिक्स हा डायनासोर आणि आधुनिक पक्षी यांच्यातील संक्रमणकालीन जीव होता. त्याचप्रमाणे, या युगात लहान सस्तन प्राणी (mammals) देखील अस्तित्वात होते, पण ते रात्रीच्या वेळी सक्रिय राहून डायनासोरांच्या छायेत लपून राहिले.

पण सुमारे 66 दशलक्ष वर्षांपूर्वी सर्वकाही बदलले. पृथ्वीवर एक प्रचंड उल्का (asteroid) आदळली. हा धक्का आजच्या मेक्सिकोतील चिक्सुलुब क्रेटर येथे बसला. या धडकेत प्रचंड ऊर्जा सोडली गेली. धुळीचे आणि धुराचे प्रचंड ढग वातावरणात पसरले. सूर्यप्रकाश अनेक वर्षे पृथ्वीपर्यंत पोहोचू शकला नाही. 'Impact Winter' मुळे तापमानात अचानक आणि प्रचंड घट झाली. वनस्पती नष्ट झाल्या, अन्नसाखळी कोलमडली आणि Cretaceous-Paleogene (K-Pg) Extinction घडला. या महाविनाशात सर्व डायनासोर (पक्ष्यांव्यतिरिक्त) नष्ट झाले.

हा विनाश पुन्हा एकदा नव्या जीवनासाठी द्वार उघडणारा ठरला. डायनासोरांच्या वर्चस्वामुळे दबलेले सस्तन प्राणी आता मुक्तपणे विस्तारू लागले. त्याच सस्तन प्राण्यांच्या वंशजांमधून पुढे मानवाची उत्क्रांती झाली.

डायनासोर युग आपल्याला एक गहन सत्य शिकवते की पृथ्वीवरील जीवन हा केवळ निर्माणाचा नव्हे, तर सतत नाश आणि पुनर्निर्मितीचा प्रवास आहे. कितीही शक्तिशाली आणि यशस्वी प्रजाती असली, तरी बदलत्या परिस्थितीत तिचे वर्चस्व कायमचे राहत नाही. प्रत्येक अंत हा नव्या सुरुवातीची बीजे घेऊन येतो.

डायनासोर पूर्णपणे नष्ट झाले नाहीत. त्यांचे वंशज आजही आपल्याभोवती उडत आहेत. ते म्हणजे पक्षी! जेव्हा आपण आकाशात उडणारा कावळा किंवा गवतात चिमणी पाहतो, तेव्हा आपण खरं तर डायनासोरांच्याच वंशजांकडे पाहत असतो.

पुढील प्रकरणात आपण "सस्तन प्राण्यांचा उदय आणि मानवाच्या उत्क्रांतीची सुरुवात" यावर सखोल चर्चा करणार आहोत. तोवर आजच्या या प्रकरणावर चिंतन, मनन आणि चर्चा करूया.

**- ॲड. शीतल शामराव चव्हाण**

◆ पान ९ वरून पुढे...

## पैसे खाली...

आहे. केज येथील स्वामी विवेकानंद विद्यामंदिर येथील शिक्षक गोविंद दादासाहेब गायकवाड (रा. युसुफवडगाव ता. केज, ह.मु. विठाईपुरम कळंब रोड केज) यांच्या गावाकडे त्यांच्या शेतात विहिरीचे बांधकाम सुरू असल्याने त्यांनी दि. ७ मे रोजी सकाळी त्यांनी राजर्षी शाहु अर्बन बँक येथून १ लाख ५ हजार रु. काढले व ते त्यांच्या जवळ असलेल्या एका टिफीन बॅग मध्ये ठेवले त्या नंतर त्यांनी महाराष्ट्र ग्रामीण बँक भवानी चौक येथ बँकेतून ५० हजार रु. काढले आणि ते सुद्धा त्या टिफीन बॅग मध्ये ठेवले. तसेच पुन्हा त्यांनी भवानी चौकातील पेट्रोल पंपा शेजारी असलेल्या एटीएम मधून ४० हजार रु.काढले आणि ते पँटच्या खिशात ठेवले. १ लाख ५५ हजार रु. ठेवलेली पैशाची टिफीन बॅग त्यांनी त्यांच्या मोटार सायकलच्या हँडलला अटडकवुन घरी जात असताना ११:४५ वा. सुमारास ते रुबाब नावाच्या रेडीमेड कपड्याच्या दुकाना समोर आल्या नंतर त्यांच्या पाठी मागुन येत असलेल्या मोटार सायकलवर येणाऱ्या दोन व्यक्तीनी त्यांना आवाज देवुन सांगितले की, तुमचे पैस खाली पडले आहेत. असे सांगितल्याने दादासाहेब गायकवाड हे मोटार सायकल परत वळवुन थांबले. तेव्हा तेथुन मोटार सायकलवरुन जात असलेल्या एका तिसऱ्या व्यक्तिने त्यांना सांगितले तेथे बाजुला तुमचे पैसे पडले आहेत. असे सांगितल्याने गायकवाड हे मोटार सायकलच्या खाली उतरुन पडलेल्या पैन घेई पर्यंत त्यांनी मोटार सायकलच्या हँडलला लावलेली पैशाची बॅग कोणीतरी चोरी करून पळून गेले. त्या नंतर शिक्षक दादासाहेब गायकवाड यांनी केज पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारी वरून अज्ञात चोरट्या विरुद्ध गु र नं २६९/२०२३ भा. न्या. सं. ३०३(२), ३(५) नुसार अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक राजू वाघमारे हे तपास करीत आहेत.

## जिल्हाधिकारी अविनाश....

चौकशीसाठी ताब्यात घेतले आणि नंतर त्याला अटक करण्यात आली. दुपारी न्यायालयात हजर करताना पोलिसांनी आरोपीची दहा दिवसांची पोलीस कोठडी मागितली होती. आरोपीचा लॅपटॉप जप्त करणे, आवाजाचे नमुने घेणे, कॉल रेकॉर्डिंगची तपासणी करणे तसेच लातूर, पुणे आणि मुंबई येथील घरांची झडती घेणे आवश्यक असल्याचे पोलिसांनी न्यायालयात सांगितले. तपासादरम्यान १५४ पैकी १४८ संचिका पोलिसांना मिळाल्या असून सहा संचिका अद्याप गायब असल्याचे समोर आले आहे. त्या शोधण्यासाठी अधिक तपासाची गरज असल्याचे पोलिसांनी नमूद केले. दरम्यान, आरोपीच्या वकिलांनी पोलीस कोठडीला विरोध करत सर्व कागदपत्रे कार्यालयीन स्वरूपाची असल्याचा दावा केला. गुन्हा दाखल झाल्यानंतर उशिराने अटक करण्यात आली असल्याने पोलीस कोठडीची आवश्यकता नसल्याचा युक्तिवाद बचाव पक्षाने केला. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने अविनाश पाठका'ला सात दिवसांची पोलीस कोठडी मंजूर केली. आरोपीच्या वतीने ॲड. के. पी. ठिगळे आणि ॲड. मिलिंद वाघिरकर यांनी बाजू मांडली, तर सरकारच्या वतीने ॲड. अजय सरवदे यांनी काम पाहिले.

## मंदिरासमोर लघुशंका....

यांच्या विरुद्ध युसुफ वडगाव पोलिस ठाण्यात गु. र. नं. १२७/२०२६ भा. न्या. सं. ११५(२), ११८(१), ३५१(२), ३५२ आणि ट्रॉसिटीचे कलम १(३)(आर),१(३)(एस),३(२)(व्हि ए) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी सहाय्यक पोलिस अधीक्षक वेंकटराम हे तपास करीत आहेत.

## कलिंगड खाऊन.....

नसून उंदीर पळवण्याचं आहे. उंदीर पळवण्याच्या औषधात झिंक फॉस्फाइड नसल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. त्यामुळं आता पायधूनीतील चौघांच्या मृत्य प्रकरणी नवीन ट्विस्ट समोर आला आहे.

उंदीर पळवण्याच्या औषधात झिंक फॉस्फाइड नसल्याची माहिती- पायधूनी चौघांच्या मृत्य प्रकरणी नवीन ट्विस्ट समोर आला आहे. डोकाडिया कुटुंबियांच्या घरातून सापडलेल उंदराच औषध उंदीर मारण्याचं नसून उंदीर पळवण्याचं असल्याचं समोर आलं आहे.

उंदीर पळवण्याच्या औषधात झिंक फॉस्फाइड नसल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. डोकाडिया यांच्या घरात सापडलेला उंदीर पळवण्याचं औषध नैसर्गिक पेपरमिंट-आधारित द्रव्य आल्याची माहिती देण्यात आली आहे. तर चौघांच्याही शरीरातून तसेच कलिंगडाच्या नमुन्यात एफएसएलच्या तपासणीत झिंक फॉस्फाइड आढळलं होतं. मग झिंक फॉस्फाइड डोकाडिया यांच्या घरात आलं कुठून? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. २६ तारखेला अवघ्या काही तासांच्या अंतरात डोकाडिया कुटुंबातील चौघांचा मृत्यू झाल्याने खळबळ उडाली होती. चौघांनी रात्री कलिंगड खाल्ले होते. कलिंगड खाल्याने मृत्यू झाल्याची शक्यता वर्तवली जात होती. २६ तारखेला अब्दुल्ला डोकाडिया (४४) त्यांची पत्नी नसरीन (३५) आयेशा (१६) आणि झैनब (१३) यांचा अचानक मृत्यू झाला होता.

चौघांच्या शरिरात झिंक फॉस्फाईट आढळलं- मुंबईतील पायधुणीतील चार जणांच्या मृत्यूचं गूढ उलगडलं आहे. कलिंगड तपासणी केल्यानंतर त्यात भेसळ आढळली नव्हती. त्या चौघांच्या शरिरात झिंक फॉस्फाईट आढळलं आहे. याचा वापर उंदीर मारण्यासाठी केला जातो. झिंक फॉस्फाईट त्या चौघांच्या शरिरात गेल्यानं त्यांना उलट्या झाल्या, या नंतर ते फॅमिली डॉक्टरकडे गेले होते. त्यानंतर त्यांना रुग्णालयात नेण्यात आलं होतं. उलट्या झाल्यानं विष बाहेर आल्यानं चौघांच्या शरिरात झिंक फॉस्फाईट होतं. उंदीर मारण्याच्या औषधानं त्यांचा मृत्यू झाला आहे. कलिना येथील एफएसएल लॅबमधील तज्ज्ञांनी अनेक चाचण्या केल्यानंतर यासंदर्भातील माहिती समोर आली आहे. चौघांच्या शरिरात झिंक फॉस्फाईट कसं गेलं याचा शोध घेतला जात आहे.

## लेक रिझल्....

मुलांच्या शिक्षणाबाबतचे पालकांचे अवास्तव स्वप्न कशाप्रकारे हिंसक बनू शकते, हे या घटनेतून स्पष्ट होते.

रक्ताच्या थारोळ्यात निष्पाप लेक- मिळालेल्या माहितीनुसार, रागाच्या भरात असलेल्या वडिलांनी मुलीला बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. ही मारहाण इतकी भीषण होती की चिमुरडीला गंभीर दुखापत झाली. घरातील वस्तूंचा वापर करून किंवा भिंतीवर डोके आदळून तिचा जीव घेण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. घटनेच्या वेळी घरात इतर कोणाची उपस्थिती होती का, याचा तपास पोलीस करत आहेत. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या त्या निष्पाप मुलीला पाहून परिसरातील नागरिकांनीही हळहळ व्यक्त केली.

आरोपीला अटक- घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या मुलीला रुग्णालयात नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. पोलिसांनी तातडीने पंचनामा करून आरोपी पित्याला बेड्या ठोकल्या आहेत. आरोपीवर भारतीय दंड संहितेच्या संबंधित कलमान्वये खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस या प्रकरणाचा अधिक सखोल तपास करत आहेत.

नागरिकांचा संताप- या घटनेची बातमी वाऱ्यासारखी पसरताच सोशल मीडिया आणि पुण्याच्या गल्लीबोळात संतापाची लाट उसळली आहे. गुण मिळवणे म्हणजे आयुष्य जगणे नव्हे, अशा प्रतिक्रिया नागरिकांमधून येत आहेत. शिक्षणाच्या नावाखाली चाललेला हा जीवघेणा प्रकार थांबायला हवा, अशी मागणी जोर धरत आहे. शेजारील रहिवाशांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित वडील यापूर्वीही मुलीच्या अभ्यासावरून कडक वागत असत, मात्र ते इतके टोकाचे पाऊल उचलतील याची कोणालाच कल्पना नव्हती.

पालकांसाठी धोक्याची घंटा- ही घटना केवळ एक गुन्हा नसून समाजातील बिघडत चाललेल्या मानसिकतेचे लक्षण आहे. मुलांवर अभ्यासाचा ताण टाकताना पालकांनी स्वतःच्या रागावर नियंत्रण मिळवणे किती गरजेचे आहे, हे यातून अधोरेखित होते. मानसोपचार तज्ज्ञांच्या मते, पालकांनी आपल्या पाल्यांच्या गुणांपेक्षा त्यांच्या कौशल्याला आणि मानसिक आरोग्याला प्राधान्य दिले पाहिजे. अशा प्रकारच्या घटना रोखण्यासाठी समाजात पालकांचे समुपदेशन होणे अत्यंत गरजेचे आहे.

शिक्षणाचे ओझे की जीवघेणी स्पर्धा? पुण्यातील ही घटना शैक्षणिक व्यवस्थेतील आणि पालकांच्या विचारसरणीतील त्रुटींवर बोट ठेवते. एका ९ वर्षांच्या मुलीला अजून आयुष्य काय असते हे समजायच्या आतच जगाचा निरोप घ्यावा लागला, तेही तिच्या स्वतःच्या वडिलांमुळे. हा निकाल केवळ त्या मुलीचा नव्हता, तर समाजाच्या आणि पालकत्वाच्या अपयशाचा निकाल आहे. कायद्यानुसार आरोपीला कठोर शिक्षा होईलच, मात्र गेलेला जीव परत येणार नाही.

## टँकरच्या पुढच्या....

तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन उत्तरीय तपासणीसाठी जवळच्या ग्रामीण रुग्णालयात पाठवले आहेत. अपघातग्रस्त टँकर आणि दुचाकी बाजूला करून महामार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यात आली.

वारजे परिसरावर शोककळा- राजेंद्र मोरे आणि सविता मोरे हे पुणे शहरातील वारजे माळवाडी भागातील रहिवासी होते. एका हसत्या-खेळत्या कुटुंबावर काळाने झडप घातल्याने वारजे परिसरावर शोककळा पसरली आहे . अवजड वाहनांची बेशिस्त वाहतुकीमुळे निष्पाप नागरिकांचे बळी जात आहेत, अशी संतप्त प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे.

गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू- राजगड पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. महामार्गावर सुरक्षिततेचे नियम धाब्यावर बसवून वाहन चालवणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी आता जोर धरत आहे. खेडशिवापूर परिसरात सातत्याने होणाऱ्या अपघातांमुळे प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## नदी पात्रात....

तेव्हा त्यांची दुचाकी सिंदफणा नदी पात्रात आढळून आल्याने नदीपात्रात शोधात सुरू केली असता एकनाथ शेंडगे यांचा मृतदेह पाण्यात तरंगत असल्याचे दिसून आले. त्यानंतर त्यांना बाहेर काढून ग्रामीण रुग्णालयात नेले. तेथील डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. दरम्यान उत्तरीय तपासणी करून त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या प्रकरणी पोलीस ठाण्यात नोंद करण्याची प्रक्रिया सुरू होती. मयत व्यक्तीच्या पश्चात पत्नी व एक मुलगा असा परिवार आहे.

## दीड कोटीच्या....

या संस्थांना कायमस्वरूपी काळ्या यादीत टाकले जाणार आहे. जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने बुधवारी (ता. सहा) यासंदर्भात नोटिसा बजावल्या असून, संबंधितांना ही रक्कम भरण्यासाठी सात दिवसांची अंतिम मुदत देण्यात आली आहे.

वर्ष २०२३ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेतून मोहा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नूतनीकरणासाठी दीड कोटी रुपयांचा भरीव निधी मंजूर करण्यात आला होता. या निधीतून मुख्य इमारतीची दुरुस्ती, कार्यालयाचे नवीन फर्निचर, वॉटरप्रूफिंग, वैद्यकीय अधिकारी आणि आरोग्य सेविकांच्या निवासस्थानांची डागडुजी, लेडी हेल्थ व्हिजीटर निवासस्थान दुरुस्ती, नवीन शवविच्छेदनगृहाचे बांधकाम, स्वच्छतागृहांची दुरुस्ती, नळ जोडणी, आरोग्य केंद्रासमोर उद्यान तयार करणे, वाहन शेड उभारणे, काँक्रीट नाली बांधकाम, पेव्हर ब्लॉक बसवणे, संरक्षण भिंत आणि सिमेंट रस्ता तयार करणे अशी एकूण १५ ते २० प्रकारची कामे हाती घेण्यात आली होती. ही कामे शीतल तांदळे, गजानन मजूर सहकारी संस्था, चारुदत्त खेडकर, शशिकांत सांगळे, श्री संत भगवानबाबा मजूर सहकारी संस्था, अजय ढाकणे, विशाल कोटुळे, शिवशंकर शिंदे, अनिल गरड आणि गोविंद शिंदे या ठेकेदार संस्था व सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांनी वाटून घेतली होती. मात्र, ही कामे प्रत्यक्ष जमिनीवर अर्धवट किंवा निकृष्ट दर्जाची असतानाही, कागदोपत्री ती पूर्ण दाखवून प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या संगनमताने संपूर्ण देयके उचलण्यात आली होती.

## देवस्थान इनाम.....

सामाजिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक व्यवस्थेचा आधारस्तंभ असल्याचे मत सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे व रामनाथ खोड यांनी लेखी निवेदनाद्वारे विभागीय आयुक्त , जिल्हाधिकारी बीड, पोलिस अधीक्षक बीड यांना शंका व्यक्त करत हरकती घेतल्या आहेत. लवकरच याप्रकरणी आंदोलन करण्यात येणार आहे. हरकतीमध्ये नमूद करण्यात आले आहे की, राज्यातील अनेक प्राचीन मंदिरे, मठ, देवस्थाने, दर्गे व धार्मिक संस्थांचे दैनंदिन व्यवस्थापन हे संबंधित इनाम जमिनींच्या उत्पन्नावर चालते. अन्नदान, महाप्रसाद, यात्रोत्सव, वेदपठण, भजन-कीर्तन, वारकरी सेवा, धर्मशाळा व्यवस्था तसेच गरीब व गरजू भक्तांना मदत यांसारखे अनेक धार्मिक व सामाजिक उपक्रम शेतजमिनीच्या उत्पन्नातून चालविले जातात. त्यामुळे इनाम जमिनींचे निर्मूलन किंवा हस्तांतरण झाल्यास हे उपक्रम गंभीरपणे बाधित होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील अनेक देवस्थानांकडे उत्पन्नाचे अन्य कोणतेही स्थिर साधन नसल्याने मंदिरांची दुरुस्ती, पूजाअर्चा, वीज बिल, स्वच्छता व पुजारी मानधन यांसारखे आवश्यक खर्च भागविणे कठीण होईल, असेही निवेदनात म्हटले आहे. अनेक ऐतिहासिक देवस्थाने पूर्वी विस्तृत क्षेत्रावर अस्तित्वात होती; मात्र विविध कारणांमुळे आज त्यांची जागा अत्यंत मर्यादित झाली असून एकरावरील मंदिरे गुंठ्यावर आली अशी परिस्थिती निर्माण झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. देवस्थाने ही केवळ पूजा करण्याची ठिकाणे नसून धर्मप्रसार, संस्कृती संवर्धन, समाजजागृती व सामाजिक एकात्मतेची केंद्रे असल्याचे सांगत लाखो भाविकांच्या श्रद्धेशी संबंधित संस्थांची आर्थिक पायाभूत व्यवस्था कमजोर करणे हे सार्वजनिक हिताच्या विरोधात असल्याचा दावा करण्यात आला आहे. प्रस्तावित अधिनियमामुळे देवस्थानांच्या मालमत्तेवर अतिक्रमण, अनधिकृत हस्तांतरण व व्यापारीकरण वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. तसेच भविष्यात प्रभावशाली जमीनस्वार्थी घटकांच्या ताब्यात अशा जमिनी जाण्याचा धोका असून त्याचा लाभ सर्वसामान्य शेतकऱ्यांपेक्षा आर्थिक व राजकीय प्रभाव असलेल्या घटकांना मिळू शकतो, अशी भीतीही डॉ.गणेश ढवळे, रामनाथ खोड यांनी व्यक्त केली आहे. अनेक देवस्थानांच्या जमिनी या ऐतिहासिक दान, राजाश्रय किंवा धार्मिक हेतूसाठी देण्यात आलेल्या असल्याने त्यांचे हस्तांतरण करणे हे मूळ दान उद्देशाच्या विरोधात ठरेल, असे हरकतीमध्ये नमूद करण्यात आले आहे. राज्यातील लहान देवस्थानांची आर्थिक स्थिती आधीच कमकुवत असून इनाम जमिनी संपुष्टात आल्यास अनेक मंदिरे निष्क्रिय होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. याशिवाय भारतीय राज्यघटनेतील कलम २५ व २६ नुसार धार्मिक संस्थांना स्वतःचे धार्मिक व्यवहार व संपत्ती व्यवस्थापनाचे अधिकार संरक्षित असल्याने प्रस्तावित अधिनियमामुळे घटनात्मक अधिकारांवर परिणाम होऊ शकतो, असा दावा करण्यात आला आहे.

## शिदोड येथील.....

मध्ये २० विद्यार्थी आणि द्वितीय श्रेणी मध्ये ०६ उत्तीर्ण झाले आहेत. एकंदरीतच विद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी ८० टक्क्यांहून अधिक गुण मिळवत शाळेच्या गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. विद्यार्थ्यांच्या या उज्ज्वल यशामुळे शिदोड आणि परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून पालकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. सर्व गुणवंत व यशस्वी विद्यार्थ्यांचे शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या संस्थापक अध्यक्षा श्रीमती सुदामतीताई वाघ, संस्थेचे अध्यक्ष श्री. गणेश वाघ, सचिव श्री. नामदेवराव वाघ, शाळेचे मुख्याध्यापक श्री. दत्तात्रय चव्हाण सर, श्री. आत्माराम वाव्हळ सर, श्रीमती फाटे मॅडम, श्रीमती साळुंके मॅडम, श्रीमती सानप मॅडम यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक आणि शिक्षणप्रेमी नागरिकांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## रामप्रसाद डोईफोड....

पिपंळनेर व ईट येथे डेमो देण्यात आले यावेळी महिला आर्थिक विकास महामंडळाचेजिल्हा समन्वयक अधिकारी विलास जकताप सर, प्रकल्प सल्लागार कुरेशी मॅडम, लोकसंचलित साधनकेंद्र व्यवस्थापक सविता औटे मॅडम, सहयोगीनी राणी मोकाशी उपस्थित होत्या तसेच प्रात्येक्षिक देण्यासाठी चे अतिशय महत्वाची जबाबदारी श्री रामप्रसाद डोईफोडे यांनी पार पाडली तसेच शेती करतांना काय काय बारकावे तपासावेत याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी पत्रकार घरत सर यांनीही महिलांना मोलाचे मार्गदर्शन केली व महिलांना सेंद्रिय शेती करण्यासाठी प्रोत्साहन दिले व रामप्रसाद डोईफोडे यांनी दसपर्णी अर्क व जिवामृत गांडूळ बेड याचे सविस्तर मार्गदर्शन केले त्या वेळी त्या गटातील सर्व सदस्य हजर होते

## कु.स्वरुपा बदाम....

युवा नेते बदाम सोमेश्वर पौळ यांची कन्या कु. स्वरुपा पौळ हिने ९२.६० टक्के गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे. शहरातील भारती बांगर इंटरनॅशनल स्कुल या शाळेची ती विद्यार्थीनी आहे. या यशाबद्दल शाळेतील सर्व शिक्षक वृंद, पौळ कुटुंबीय, नातेवाईक तसेच सुशी ग्रामस्थ यांच्यासह सर्व स्तरातून तिचे अभिनंदन होत आहे. शिक्षक, पालक यांचे मार्गदर्शन व जिद्द, चिकाटी अन् अथक परिश्रमातून हे यश मिळवल्याचे तीने यावेळी बोलताना सांगितले.

## आष्टी बसस्थानकाची....

अवैध व्यवसायांवरही तातडीने कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. बसस्थानकाची ही अवस्था म्हणजे आमच्या रोजच्या प्रवासातील वेदना आहेत. प्रशासनाने आता तरी गंभीर दखल घ्यावी. आष्टी बसस्थानकाचा हा दीर्घकाळ रखडलेला प्रश्न कधी सुटणार, याकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

## थोडक्यात...

### माध्यमिक आश्रमशाळा अंधरवण पिंपरी तांडा शाळेचा इयत्ता १० वी बोर्ड परीक्षेचा ९५.६१ निकाल

**बीड । प्रतिनिधी**

बीड (प्रतिनिधी):- बीड पासून जवळच श्री सद्गुरु बंजारा सेवा संघ संचलित, माध्यमिक आश्रमशाळा अंधरवण पिंपरी तांडा ता.जि.बीड. इ.१० वी बोर्ड परीक्षा फेब्रुवारी २०२६ निकाल ९५.६१ टक्के निकाल लागला. प्रथम-कु. स्विटी गौतम कांबळे (९५.२०%), व्दितीय- चि. रितेश भारत शिंदे (९१.००%), तृतीय- चि. अक्षय लहु पवार (८९.६०%), चौथा क्रमांक - कु. अक्षरा ईश्वर गोरे (८८.६०%), चौथा क्रमांक -कु. ऋतुजा संभाजी शिंदे (८८.६०%), पाचवा क्रमांक कु. सिता प्रल्हाद शिंदे (८८.००%) या विद्यार्थ्यांनी मिळविला. इ.१० वी विज्ञान परीक्षेस ११५ विद्यार्थी बसले होते. यामध्ये विशेष प्राविण्य-३७, प्रथम श्रेणी-५३, व्दितीय श्रेणी-१५, तृतीय श्रेणी- ४ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष दिनेशराव पवार, मार्गदर्शक सुशील पवार, संस्थेचे सचिव अतुल पवार, प्राचार्य खंदारे सर, मुख्याध्यापक शिंदे डी.ए सर, पर्यवेक्षक जवरे सर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करुन पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### मानवी जीवनात कर्माची शुद्धता आणि सद्गुरु भक्ती महत्त्वाची : वेदविभूषण उद्बोध महाराज




**बीड । प्रतिनिधी**

माणसाने आपले विहित कर्म करत राहणे यातच त्याचे खरे हित आहे. कर्माच्या फळावर माणसाचा अधिकार नसून, शुद्ध भावनेने केलेली सद्गुरूंची भक्तीच मानवी जीवनाचा उद्धार करू शकते. सद्गुरू पाठीशी असतील, तर भवसागराची नाव तारून नेण्यासाठी इतर कोणाचीही आवश्यकता उरत नाही, असे प्रतिपादन वेदविभूषण उद्बोध महाराज (श्रीक्षेत्र देऊळगावराजा) यांनी केले. शहरातील स्व. झुंबरलाल खटोड सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित 'श्री नवनाथ कथासार' या संगीतमय कथेची शुक्रवारी (दि. ८) मोठ्या उत्साहात सांगता झाली. याप्रसंगी भाविकांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. कथेच्या प्रारंभी प्रतिष्ठानचे अध्यक्ष गौतम खटोड व पदाधिकाऱ्यांच्या हस्ते महाराजांचे पुष्पहार अर्पण करून स्वागत करण्यात आले. कथेतून निरूपण करताना उद्बोध महाराज म्हणाले, आज समाजात चंचलता वाढल्याने मनाची एकाग्रता हरवत चालली आहे. संत आणि भगवंत उपासना प्रत्येकाकडून घडली पाहिजे. भक्तिमार्गात एकविधता असणे आवश्यक आहे. ही एकविधता हरवल्यानेच पारमार्थिक जीवनात अडथळे निर्माण होतात. गुरुचरणाची माती हीच आमच्यासाठी भागीरथी आहे, असा उदात्त भाव शिष्याच्या ठायी असावा, असेही त्यांनी अधोरेखित केले. विज्ञानाची सांगड अध्यात्माशी घालताना उद्बोध महाराजांनी भाविकांना विविध दाखले दिले. तसेच नाथ संप्रदायाची परंपरा आणि गुरू-शिष्य परंपरेचे महत्त्व विशद केले. जेव्हा जेव्हा धर्म आणि संस्कृतीची घडी विस्कटते, तेव्हा संत अवतार घेऊन समाजाला दिशा देण्याचे काम करतात, असेही त्यांनी सांगितले. या कथा सोहळ्यासाठी बीड शहरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्व.झुंबरलाल खटोड प्रतिष्ठानच्या वतीने या धार्मिक उपक्रमाचे नेटके नियोजन करण्यात आले होते.

### राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत आदित्य फार्मसी कॉलेजच्या ऋषिकेश मोहाळेचे यश



**बीड । प्रतिनिधी**

शहरातील आदित्य फार्मसी कॉलेजचा विद्यार्थी ऋषिकेश सुरेश मोहाळे याने राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत सुयश संपादन केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित या स्पर्धेत ऋषिकेशने आपल्या प्रभावी वक्तृत्वशैलीने बाजी मारत महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या यशाबददूल आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी ऋषिकेशचे अभिनंदन करत सत्कार केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे यांच्या वतीने या राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातील नामांकित महाविद्यालयांतील शेकडो विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. अत्यंत चुरशीच्या झालेल्या या स्पर्धेच्या अंतिम फेरीत ऋषिकेशने आपल्या विषयाची सखोल मांडणी, आत्मविश्वासपूर्ण शैली आणि प्रभावी आवाजाच्या जोरावर परीक्षकांची मने जिंकली. सत्कार प्रसंगी बोलताना डॉ. आदिती सारडा म्हणाल्या की, विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देणे ही आमच्या संस्थेची परंपरा आहे. ऋषिकेशने राज्यस्तरावर मिळवलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिपक पवार यांनीही ऋषिकेशचे कौतुक करत विद्यापीठाचे आभार मानले. केवळ शैक्षणिकच नव्हे, तर सांस्कृतिक आणि अवांतर क्षेत्रातही विद्यार्थी चमकत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. ऋषिकेशच्या या यशामुळे संपूर्ण जिल्ह्यातून आणि शैक्षणिक वर्तुळातून त्याचे अभिनंदन होत आहे.

# पनीर की चीज ॲनालॉग ? मेन्यू कार्डवर स्पष्ट उल्लेख बंधनकारक


**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

पनीर आणि चीज नालॉग हे दोन अन्नपदार्थ वेगवेगळे असून दोघांचेही पोषणमूल्य वेगवेगळे आहे. याबाबत ग्राहकाला स्पष्ट कल्पना यावी यासाठी मेन्यू कार्डवर तसा उल्लेख करणे बंधनकारक करण्यात आले आहे. जे हॉटेल्स, अन्न व्यावसायिक या नियमांचे पालन करणार नाही त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याचे निर्देश अन्न व औषध प्रशासनाला जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी दिले आहेत. यासंदर्भात अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त श्रीधर डुबे पाटील यांनी कळविले आहे की, रेस्टॉरंट्स, हॉटेल्स, केटरर्स, फास्टफुड विक्रेते इ. अन्न पदार्थ तयार करतांना त्यात पनीर ऐवजी चीज नालॉगचा वापर करतात. तथापि, पनीर व चीज नालॉग हे दोन वेगवेगळे पदार्थ आहेत. त्यांचे पोषणमूल्य वेगळे आहे. पनीर हा दुधापासून बनवला जाणारा पदार्थ आहे. आणि चीज नालॉग हे खाद्यतेल,स्टार्च, फुड डीटीव्ह यांचा वापर करुन तयार केले जाते. अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ नियम व नियमने २०११ अन्वये चीज नालॉगच्या उत्पादन, विक्रीला किंवा वापराला बंदी नाही मात्र जे ग्राहक हा पदार्थ अन्न म्हणून ग्रहण करतात त्यांना हा पदार्थ खाण्या/ वापरण्याबाबत योग्य निर्णय घेण्यासाठी अन्नपदार्थातील घटकांची माहिती उपलब्ध असणे आवश्यक आहे. तसेच अन्न सुरक्षा व मानके नियम २०२० नुसार अन्न व्यावसायिकांनी अन्न विक्री करतांना संबंधित पदार्थाची पोषण घटकांची माहिती स्पष्टपणे प्रदर्शित करणे बंधनकारक आहे. त्यामुळे सर्व अन्न व्यावसायिकांना आपल्या आस्थापनांचे मेन्यू कार्ड, इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले इ. ठिकाणी चीज नालॉग बाबत स्पष्ट उल्लेख करणे बंधनकारक आहे. याबाबत दि.१ मे पासून हॉटेल्स, केटरर्स, रेस्टॉरन्ट्स असा अन्न व्यावसायिकांच्या तपासणी करण्यात येणार आहेत. चीज नालॉगबाबत निर्देशांचे पालन न झाल्यास कठोर कारवाईचे निर्देश देण्यात आले आहे. सह आयुक्त (अन्न) यांचे पथक ही कारवाई करतील. तसेच पनीर व चीज नालॉग हे दोन वेगवेगळे पदार्थ असल्याबाबत ग्राहकांमध्ये जनजागृती करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

## वीरशिरोमनी महाराणा प्रताप यांच्या जयंती निमित्त उद्या अभिवादन सभेचे आयोजन

### सर्व समाज बांधवांनी उपस्थित रहावे क्षत्रिय कुलवंत राजपुत समाजाचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**




महाराष्ट्रासह भारतात वीरशिरोमनी महाराणा प्रताप यांची जयंती दि.९ मे रोजी साजरी केली जाते. त्यांचा जन्म मेवाड येथे ९ मे १५४० साली झाला होता. महाराणा प्रताप हे सिसोदिया कुळातील हिंदू पराक्रमी राजपूत होते. तथापि, ते नायक आणि योद्धा असूनही धर्म पारायण आणि मानवतेचे पुजारी होते. त्यांच्या जयंतीचे औचित्य साधून बीड येथील क्षत्रिय कुलवंत राजपुत समाज बांधवांच्यावतीने शहरातील यशवंत उद्यान परिसरात असलेल्या महाराणा प्रताप यांच्या पुतळ्यास ठिक सकाळी ९.३० वा. अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले आहे. राजपुत, गुजर समाज बांधवांसह सर्व महाराणा प्रताप प्रेमींनी या अभिवादन सभेस उपस्थित रहावे असे आवाहन क्षत्रिय कुलवंत राजपुत समाज बांधवांच्यावतीने लक्ष्मणसिंह ठाकूर यांनी केले आहे. भारत ही शूर वीरांची जन्मभूमी आहे. अशा शूर वीरांपैकी एक आहेत महाराणा प्रताप. महाराणा प्रताप यांचे पूर्वज मेवाडचे शासक आणि भगवान श्रीराम यांनी उत्पन्न केलेले सूर्यवंशी होते. महाराणा प्रताप यांना लहानपनापासूनच राजवाड्या पेक्षा, सामान्य जनतेबरोबर वेळ घालायला जास्त आवडत असे. महाराणा प्रताप यांनी मुघल सम्राट अकबराविरोधात कडवा संघर्ष केला. त्यांनी कधीही अकबरासमोर शरणागती पत्कारली नाही. असे महान वीरशिरोमनी महाराणा प्रताप यांच्या जयंती निमित्त क्षत्रिय कुलवंत राजपुत व गुजर समाज बांधवांच्यावतीने अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले असून सर्व समाजातील महाराणा प्रताप प्रेमींनी या अभिवादन सभेस उपस्थित रहावे असे आवाहन क्षत्रिय कुलवंत राजपुत समाज बांधवांच्यावतीने लक्ष्मणसिंह ठाकूर, जयसिंग मामा चुंगडे, मुन्नाभैय्या हजारी, नगरसेवक राणा चौव्हाण, नगरसेवक सुरज चुंगडे, सुरेश (तात्या) शेटे, नगरसेवक राजाभाऊ गुजर, नितीन राजपुत, संजय बुंदेले, बाळासाहेब गुजर, अंबादास गुजर, अर्जुन बहिरवाळ, सचिन बुंदेले, अखिल बुंदेले, कपूर व सर्व पदाधिकारी व समाज बांधवांच्यावतीने केले आहे.

## संत ज्ञानेश्वर महाराजांनी सर्वांना सन्मार्ग दाखविला

**बीड । प्रतिनिधी**

संतांनी आपल्या जीवनात अनेक हालअपेष्टा आणि अपमान सहन केले, पण कधीही आपला संयम सुटू दिला नाही. उलट, चुकीच्या मार्गावर चालणाऱ्या मनुष्याला हरिनामाची शिकवण देऊन सन्मार्गावर आणण्याचे कार्य संत ज्ञानेश्वर महाराजांनी केले, असे प्रतिपादन निरुपणकार साध्वी अनुराधा दीदी पंढरपूरकर यांनी केले. येथील स्वर्गीय झुंबरलाल खटोड सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने शहरात आयोजित 'संत ज्ञानेश्वर महाराज चरित्र कथा' सोहळ्यात शुक्रवारी (दि. ८) चौथ्या दिवसाचे पुष्प गुंफताना त्या बोलत होत्या. प्रारंभी प्रतिष्ठानचे अध्यक्ष गौतम खटोड यांच्या हस्ते साध्वी अनुराधा दीदींचा स्वागत सत्कार करण्यात आला. कथेतून



उपदेश करताना त्या म्हणाल्या, प्रत्येकाने ज्ञानोबा माऊलींकडे प्रार्थना करावी की, विपत्तीमध्ये मी भयभीत होऊ नये, दु:खावर मला जय मिळवता यावा आणि माझे मनोबल कधीही खचू नये हीच खरी भक्ती आहे. माणूस कर्मठ असला तरी त्याच्या ठायी माणुसकी असणे अत्यंत आवश्यक आहे असेही त्या म्हणाल्या.

## शेती मशागतीसाठी ट्रॅक्टरला १०० लिटरपर्यंत डिझेल वाहतूक व साठवणुकीस परवानगी

**परभणी । प्रतिनिधी**

खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर मे व जून महिन्यात पेरणीपूर्व शेती मशागतीची कामे मोठ्या प्रमाणात सुरू होत असल्याने शेतकऱ्यांना ट्रॅक्टरसाठी डिझेल उपलब्धतेत अडचणी येऊ नयेत, यासाठी प्रशासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. शेतीच्या मशागतीसाठी वापरण्यात येणाऱ्या ट्रॅक्टरसाठी एकावेळी गरजेनुसार जास्तीत जास्त १०० लिटरपर्यंत डिझेल पेट्रोल पंपावरून घेऊन जाण्यास अटी व शर्तींसह परवानगी देण्यात आली आहे. निवेदनानुसार करण्यात आलेल्या मागणीच्या अनुषंगाने पेट्रोलियम अधिनियम, १९३४ मधील नियम ७ ते ११ तसेच पेट्रोलियम नियम, २००२ मधील नियम ६ व ७ मधील तरतुदी विचारात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. क्लास 'बी' व 'सी' प्रकारातील इंधनाच्या वाहतूक व साठवणुकीसंदर्भातील नियमांनुसार ही परवानगी लागू राहणार आहे.

प्रशासनाने जारी केलेल्या आदेशानुसार शेती मशागतीसाठी वापरल्या जाणाऱ्या ट्रॅक्टरच्या धारण क्षेत्राचा व कामाच्या गरजेचा विचार करून जास्तीत जास्त १०० लिटरपर्यंत डिझेल देण्यात येणार आहे. मात्र, हे डिझेल फक्त मान्यताप्राप्त धातूच्या किंवा जाड प्लास्टिकच्या एप्रुव्हड कंटेनरमध्येच वाहून नेता येणार असून प्लास्टिकच्या बाटल्यांमध्ये डिझेल देण्यास पूर्णतः बंदी घालण्यात आली आहे. डिझेल साठवणुकीसाठी स्टील किंवा लोखंडी कंटेनरचा वापर करणे बंधनकारक राहील. तसेच कंटेनरमध्ये किमान ५ टक्के रिकामी जागा ठेवणे आवश्यक राहणार आहे. साठवणुकीची जागा हवेशीर असावी तसेच ज्वलनशील पदार्थांपासून दूर ठेवावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. यासोबतच संबंधित ठिकाणी 'धूम्रपान निषेध' व 'आगीपासून सावध' असे फलक लावणे आवश्यक राहणार आहे.

डिझेल रिकामे करताना गळती होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. पेट्रोल पंपावरून डिझेल घेऊन जाताना शेतकऱ्यांना आधारकार्ड, ॲग्री स्टॅक क्रमांक, ७/१२ उतारा, खातेदाराचे धारणक्षेत्र दर्शविणारा नमुना ८-अ तसेच ट्रॅक्टरचे आरसी बुक सादर करणे बंधनकारक राहील. दरम्यान, पेट्रोलपंप चालकांनी एकदा डिझेल दिल्यानंतर पुढील पुरवठा किमान १५ दिवसांच्या अंतरानेच करावा,

## भालचंद्र विद्यालयाचा दहावी निकाल ९६.०६ टक्के; स्नेहल ढास प्रथम



**लिंबागणेश:**

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०२६ मध्ये भालचंद्र विद्यालयाने ९६.०६ टक्के निकालाची उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे. विद्यालयातून परीक्षेसाठी १२७ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी १२२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून ०५ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले आहेत.

विद्यालयातून गुणानुक्रमे प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांमध्ये कु. स्नेहल दादासाहेब ढास हिने ९४.४० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. ढास अक्षरा राजाभाऊ हिने ९३.६० टक्के गुणांसह द्वितीय, रणखांब आर्यन शिवाजी याने ९३.२० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला. सय्यद अली सलीम याने ९२.६० टक्के गुण मिळवत चौथा तर कु. वैद्य कल्याणी हनुमान हिने ९१.८० टक्के गुणांसह पाचवा क्रमांक मिळविला. विद्यालयातील ५० विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले असून ४५ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी मिळविली आहे. तसेच २३ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत तर ०४ विद्यार्थी तृतीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. या यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्था सचिव तथा मार्गदर्शक मा. दीपक (दादा) घुमरे, संस्था अध्यक्ष मा. यु. बी. सुकाळे (अप्पा), उपाध्यक्ष मा. कल्याणराव वाणी (बापू), संचालक मा. नामदेव (नाना) जाधव, मा. रमेशचंद्र पाटील (दादा), मा. दिलीप बारगजे, मुख्याध्यापक श्री. सावंत के. बी., प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर सहकारी यांनी अभिनंदन केले. तसेच परिसरातील पालक, ग्रामस्थ व विविध स्तरांतून विद्यार्थ्यांवर शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला असून त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.


### जाहीर प्रगटन

**मा. माणिकराव रा. सातव ७वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**
**दिवाणी अर्ज क्र. ६५२/२०२६**
**रमेश व इतर वि. निरंक**

अर्जदार- **१. रमेश पि. ज्ञानोबा शिंदे, वय ५५ वर्षे, धंदा शेती, रा. नेकनूर, ता. जि. बीड. २. कमल भ्र. विष्णु लउळ, वय ५२ वर्षे, धंदा घरकाम, रा. लऊळ वस्ती, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड. ३. मनिषा भ्र. एकनाथ घोडके, वय ४५ वर्षे, धंदा घरकाम, सफेपुर, ता. जि. बीड. ४. नंदकिशोर पि. दिलीप शिंदे, वय २५ वर्षे, धंदा शेती, रा. नेकनूर, ता. जि. बीड.**

विरुध्द

गैरअर्जदार- निरंक

मागणी : कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी **निर्मला भ्र. ज्ञानोबा शिंदे यांचा मृत्यु दि. २४/०३/२०२६ रोजी नेकनूर, ता. जि. बीड** येथे मयत झालेले असून अर्जदार मयत निर्मला भ्र. ज्ञानोबा शिंदे यांचे वारस आहे. वरील अर्जदार यांना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्र याची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास सांगवयाचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी हया न्यायालयात हजर होऊन हरकती आपल्या कळवाव्यात, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहू मयत निर्मला भ्र. ज्ञानोबा शिंदे यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०६ माहे ०५ सन २०२६ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिवयाने दिले. **सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १७/०७/२०२६ आहे.**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड**

शिक्का **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**मा. वसंत एस. यादव साहेब. ८ वे सह दिवाणी न्यायाधीश व स्तर बीड, ता.जि.बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: ६६५/२०२६**
**शिवाजी व इतर विरुद्ध - निरंक**

अर्जदार- **१) शिवाजी पि.वामनराव काळे वय ६७ वर्षे, धंदा - शेती २) रघुनाथ पि. वामनराव काळे वय ६५ वर्षे, धंदा - शेती, ३) एकनाथ पि.वामनराव काळे वय ५३ वर्षे, धंदा शेती, ४) नवनाथ पि.वामनराव काळे वय ५७ वर्षे, धंदा शेती सर्व रा. नेकनुर ता.जि. बीड. ५) नंदाबाई भ्र. लक्ष्मण जोगदंड वय ६२ वर्षे, धंदा - घरकाम रा. देविबाभळगांव ता.जि.बीड ६) गंधरावाई भ्र. सुग्रीव आनवणे वय ५२ वर्षे, धंदा - घरकाम रा.चाकरवाडी ता.जि.बीड**

ज्याअर्थी मयत नामे वामन रंगनाथ काळे रा. नेकनुर ता.जि.बीड हे दि. ०९.०४.२०२९ रोजी मौजे नेकनुर ता. जि. बीड येथे मयत झाले आहेत.

१) हे की, वामन रंगनाथ काळे हे दि.०९/०४/२०१९ रोजी नेकनुर ता.जि.बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ ते ४ हे मयताचे मुले असुन अर्जदार क्र.५ व ६ मयताच्या विवाहीत मुली आहेत. मयताची पत्नी जनाबाई वामन काळे या दि. २७.०८.२०१२ रोजी मयत झालेल्या आहेत. मयतास वर नमुद अर्जदारांशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे वामन रंगनाथ काळे रा. नेकनुर ता.जि.बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज २४-०४-२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. **पुढील तारीख : २४.०६.२०२६**

**(मार्फत ॲड. टी. बी. भालेराव बीड)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड**

शिक्का **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

### जाहीर प्रगटन

**मा. श्री. मा.ये. वाघ ५ वे दिवाणी न्यायाधीश व. स्तर, बीड, ता. जि. बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ७५९/२०२६**
**कांताबाई चोरमले ईतर वि. निरंक**

ज्यापेक्षा **अंबादास दादाराव चोरमले, हे दिनांक ०१/०३/२०२६ रोजी रामनगर, जिरेवाडी, ता. जि. बीड** येथे मयत झालेल्या आहे, आणि तसेच अर्जदार

**१. कांताबाई भ्र. अंबादास चोरमले, बय.८६ वर्षे, धंदा. घरकाम, रा. रामनगर, जिरेवाडी, ता. जि. बीड. २. बाळनाथ पि. अंबादास चोरमले, वय ४२ वर्षे, धंदा. शेती, रा. वरीलप्रमाणे. ३. भाऊसाहेब पि. अंबादास चोरमले, वय ४१ वर्षे, धंदा. शेती, रा. वरीलप्रमाणे. ४. आशाबाई भ्र.अरुण जेटे, वय. ४६ वर्षे, धंदा. घरकाम, रा. शहाजानपूर, पो. सिरसमार्ग, ता. गेवराई, जि. बीड. ५. काशीबाई भ्र. बालासाहेब चिलगर, वय ५० वर्षे, धंदा घरकाम, रा. पिंपळटका, चिंचवण, ता. वडवणी, जि. बीड**

अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असुन, अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले आहेत, अर्जदार क्र. ४ व ५ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदर अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा / अर्जदारांचा हक शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहु मयत नामे अंबादास दादाराव चोरमले यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**प्रकरणाची पुढील तारीख २४/०६/२०२६ ही आहे.**

आज दिनांक ०८ मे २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्या निशी दिले.

**(ॲड. एस. डी. घोडके यांचे मार्फत)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड**

शिक्का **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

दैनिक
# मराठवाडा पत्र
▸▸ शनिवार, दि. ०९ मे २०२६ ▸▸ Page 4

## नदी पात्रात उडी मारून व्यापाऱ्याची आत्महत्या

**बीड । प्रतिनिधी**

माजलगाव शहरातील समता कॉलनी येथील रहिवासी असलेल्या एका व्यापाऱ्याने सिंदफणा नदी पात्रात असलेल्या पाण्यामध्ये आत्महत्या केल्याची घटना घडली. महात्मा फुले शाळेसमोर अनेक वर्षापासून स्टेशनरी दुकान चालवत असलेले एकनाथ बप्पासाहेब शेंडगे (६८) यांनी घरातील सर्व मंडळी झोपलेली असताना उठून दुचाकीवरून घराबाहेर जात सिंदफणा नदी पात्र गाठले. तिथे दुचाकी उभी करून त्यावर स्वतःचे शर्ट व पॅन्ट अडकवून चप्पल व बॅटरी नदीतील पाण्याशेजारी सोडली. त्यानंतर पाण्यात उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. ।रात्री दोनला त्यांच्या पत्नीला जाग आल्यानंतर आपले पती खूप वेळ न दिसल्याने त्यांनी बाहेर येऊन पाहिले असता दार उघडे दिसले व दुचाकी न दिसल्याने त्यांची काळजी वाढली. याबाबत त्यांनी सकाळी याबाबत शहर पोलिसात याची माहिती दिली त्यांचा शोध सुरू झाला. ▶▶ उर्वरित पान २ वर

# दीड कोटीच्या निधीवर डल्ला; ठेकेदारांना दणका

## मोहा भ्रष्टाचार प्रकरण; ठेकेदारांकडून अगोदर वसुली, नंतर टाकणार काळ्या यादीत

**बीड । प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील मोहा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीची दुरुस्ती आणि नवीन बांधकाम कामांमध्ये झालेल्या मोठ्या आर्थिक अपहारप्रकरणी बीड जिल्हा प्रशासनाने आता आक्रमक पवित्रा घेतला आहे. या घोटाळ्यातील संबंधित १० ठेकेदार संस्था आणि सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांकडून तब्बल ७९ लाख रुपयांची वसुली



करण्याचे आदेश देण्यात आले असून, त्यानंतर ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● दोनवेळा झाली चौकशी

या भ्रष्टाचाराची तक्रार झाल्यानंतर पहिली चौकशी जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या माजलगाव उपविभागाच्या उपअभियंत्यांनी केली. त्यांच्या अहवालात १ कोटी ५० लाखांच्या कामात ८६ लाख ५७ हजार ९३३ रुपयांची तफावत आढळून आली होती. त्यावेळी प्रशासनाने नोटिसा बजावल्या असता, ठेकेदारांनी असा दावा केला, की आमच्या अनुपस्थितीत मोजमाप झाले असून ही कारवाई एकतर्फी आहे. ठेकेदारांच्या या दाव्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव यांच्या नेतृत्वाखाली एक विशेष समिती नियुक्त केली. या समितीने ठेकेदारांच्या समक्ष कामांची फेरपाहणी केली. या दुसऱ्या तपासणीतही ७९ लाख रुपयांची मोठी तफावत उघड झाली. प्रत्यक्ष झालेले काम आणि उचललेली रक्कम यात ताळमेळ बसत नसल्याचे सिद्ध झाले.

### ● कठोर कारवाईचे संकेत

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव यांच्या अहवालावरून मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी तत्काळ वसुलीचे आणि संस्थांना काळ्या यादीत टाकण्याचे निर्देश दिले. जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता प्रवीण मिसाळ यांनी सांगितले, की ७९ लाखांची तफावत आढळल्याने या संस्थांना पैसे भरण्याची नोटीस दिली आहे. मुदतीत प्रतिसाद न मिळाल्यास फौजदारी कारवाई आणि ब्लॅक लिस्टिंगची प्रक्रिया केली जाईल. या धडक कारवाईमुळे जिल्ह्यातील भ्रष्ट कंत्राटदारांचे धाबे दणाणले आहेत.

# देवस्थान इनाम निर्मूलन अधिनियमाविरोधात तीव्र हरकती

### देवस्थान इनाम जमिनी वाचवा! धार्मिक व सामाजिक व्यवस्थेला धोका : डॉ.गणेश ढवळे, रामनाथ खोड

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या प्रस्तावित महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन अधिनियम, २०२६ विरोधात विविध धार्मिक संस्था, देवस्थान ट्रस्ट, पुजारी व भाविकांकडून तीव्र हरकती नोंदविण्यात येत आहेत. देवस्थान इनाम जमिनी



या केवळ मालमत्ता नसून त्या धार्मिक, ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● प्रमुख मागण्या

महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन अधिनियम, २०२६ तात्काळ मागे घ्यावा.
देवस्थान इनाम जमिनींचे हस्तांतरण, निर्मूलन किंवा खासगीकरण करू नये.
देवस्थानांच्या उत्पन्न स्रोतांना स्वतंत्र कायदेशीर संरक्षण द्यावे.
राज्यातील सर्व देवस्थानांच्या जमिनींचे संरक्षण, अतिक्रमण हटविणे व अभिलेख जतन करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी.
अंतिम निर्णयापूर्वी राज्यभरातील देवस्थान ट्रस्ट, पुजारी, भाविक व धार्मिक संस्थांची सार्वजनिक सुनावणी घ्यावी.

# डिजिटल जनगणने पासून अशिक्षित व वंचित नागरिक दूरच


### १५ मे पर्यंतची मुदत वाढवण्याची सामाजिक कार्यकर्ता शेख जफर यांची मागणी

**तलवाडा । प्रतिनिधी**

सरकार द्वारे सध्या राबवण्यात येत असलेली डिजिटल जनगणना सुशिक्षित वर्गासाठी सोपी असली, तरी समाजातील अशिक्षित आणि स्मार्टफोन नसलेल्या नागरिकांसाठी ती मोठी अडचण ठरत आहे. या तांत्रिक अडचणींमुळे अनेक नागरिक जनगणनेपासून वंचित



राहण्याची भीती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर, प्रशासनाने जमिनीवरची वस्तुस्थिती लक्षात घेऊन जनगणनेची मुदत १ मे ते १५ मे पर्यंत आहे ती वाढवावी, अशी आग्रही मागणी सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे. आजही ग्रामीण आणि दुर्गम भागात अनेक कष्टकरी नागरिकांकडे स्मार्टफोन नाहीत, तर अनेकांना डिजिटल फॉर्म भरण्याचे ज्ञान नाही. केवळ सुशिक्षित लोकांची गणना होऊन चालणार नाही, तर समाजातील शेवटच्या घटकाची नोंद होणे हेच खऱ्या जनगणनेचे यश आहे, असे मत सामाजिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केले आहे. ज्या नागरिकांची अद्याप नोंद झालेली नाही, त्यांच्यासाठी विशेष पथके नेमून किंवा मुदत वाढवून प्रशासनाने त्यांना न्याय द्यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ताशेखजफरयांनीकेलीआहे



*रानफुलांचा गुच्छ, डोक्यावर मायेचा हात आणि मुखी पेढ्याचा गोडवा... सुनबाई झाल्या M.D. - पंचकर्म : डॉ. जागृती यांनी ७१% गुणांसह कॉलेजमध्ये प्रथम क्रमांक पटकावत यशाचं सुंदर शिखर गाठलं. मोठी ध्येय, मोठी स्वप्नं पण पाय मात्र अजूनही मातीवरच. पिडीत, वंचित आणि क्षत बाधितांच्या आयुष्याला नवी दिशा देणाऱ्या आनंदग्रामच्या डोंगरावर थांबून, माणुसकीची सेवा जपणाऱ्या या आगळ्यावेगळ्या सुनेला मनःपूर्वक आशीर्वाद आणि खूप खूप शुभेच्छा!*

# शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाची

## दहावीच्या परीक्षेत यशाची परंपरा कायम

### श्रेयश जाधव प्रथम, भक्ती गोरे द्वितीय तर यशराज आनेराव तृतीय

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहराजवळील शिदोड येथील शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ, बीड संचलित श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाने यंदाच्या दहावीच्या परीक्षेत उज्ज्वल यश संपादन करत यशाची परंपरा कायम राखली आहे. मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र(एस.एस.सी.) परीक्षेचा निकाल आज दिनांक ८ मे रोजी जाहीर झाला. यामध्ये विद्यालयाचा शेकडा ९० टक्के निकाल लागला आहे. या परीक्षेत चि. श्रेयश नवनाथ जाधव याने ९६.२० टक्के गुण मिळवत विद्यालयातुन प्रथम क्रमांक पटकावला. कु. भक्ती विलास गोरे



हिने ९४.४० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळविला, तर चि. यशराज गणेश आनेराव याने ९३.०० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक संपादन करत श्री महालक्ष्मी विद्यालयाच्या यशात मानाचा तुरा रोवला.

तसेच कु. स्नेहल कमलाकर शिंदे हिने ९०.४० टक्के, चि. गौरव गणेश साळुंके याने ९०.२० टक्के, चि. मेघराज हौसराव मोरे याने ८९.०० टक्के, चि. रेहान शरीफ शेख याने ८८.६० टक्के, कु. जान्हवी बदाम पदमुले व कु. अमृता बाबू पाखरे यांनी प्रत्येकी ८५.६० टक्के, चि. रविराज पांडुरंग गावडे याने ८५.०० टक्के, चि. तानाजी सुभाष काळे याने ८३.०० टक्के गुण मिळवत विशेष यश संपादन केले.

याशिवाय कु. श्रुती भाऊसाहेब कदम (८१.२०), चि. दीपक जयसिंग पाखरे (८०.६०), चि. नयन नथाराम घोडके (८०.६०), चि. कृष्णा राजेभाऊ सिरसाट (८०.२०), कु. अमृता रामप्रसाद साळुंखे (७९.८०), कु. आरोही अतुल भडगळे (७७.००), चि. ओंकार श्रीकृष्ण शिंदे (७५.६०), कु. रुपाली सचिन थोरात (७५.६०), कु. अलिशा असीम शेख (७४.४०), कु. रुपाली जालिंदर काळे (७४.४०), कु. ऋतुजा विठ्ठल पिंगळे (७३.८०), कु. प्रज्ञा सुनील पाखरे (७३.२०), चि. रोहन अशोक चव्हाण (७१.८०), चि. गणेश बाळू कुटे (७१.४०), कु. दिव्यानी राहुल डोंगरे (७०.६०), चि. गोविंद सचिन यादव (६९.६०) आणि चि. शिवम रंजीत कदम (६९.२०) यांनी ही उल्लेखनीय यश संपादन केले. या विद्यालयातून विशेष प्राविण्यसह २० विद्यार्थी, प्रथम श्रेणी ▶▶ उर्वरित पान २ वर

# रामप्रसाद डोईफोडे यांनी माविम च्या गटाला दिले प्रशिक्षण



**बीड । प्रतिनिधी**

दिनांक ७/५/२०२६ रोजी महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम ) अंतर्गत लोकसंचलित साधनकेंद्र बीड कार्यक्षेत्रातील मौजे पालवण येथे नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण उदयम विकास प्रस्कल्पा अंतर्गत महिलांच्या उत्पन्न वाढीच्या संदर्भात व महिलांना रासायनिक विरहित शेतीस प्रोत्साहन,मतिसुपीकता वाढीस मदत,कमी खर्चात जास्त उत्पन्न,महिला सक्षमीकरण व आर्थिक स्वावलंबन,पर्यावरण संरक्षण व शाश्वत विकास करण्यासाठी ऋढच् घटका अंततर्गत जीवामृत, दशपर्णी, वर्मिकंपोस्ट युनिट एकूण ३० महिलांचे सुरु करण्यासाठी आज महिलांना पालवण, ▶▶ उर्वरित पान २ वर

### कु.स्वरुपा बदाम पौळ हिचे दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश

**गेवराई । प्रतिनिधी**



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा इयत्ता दहावीचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या परिक्षेत गेवराई तालुक्यातील सुशी येथील कु. स्वरुपा बदाम पौळ हिने ९२.६० टक्के घेवून गुण घेऊन घवघवीत यश संपादन केले आहे. तीने आपल्या यशाचे श्रेय तीच्या परिवारासह शाळेतील शिक्षक वृंद यांना दिले आसून या यशाबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने शैक्षणिक वर्ष सन २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून दहावीच्या परीक्षेत गेवराई तालुक्यातील सुशी येथील भाजपचे ▶▶ उर्वरित पान २ वर

# आष्टी बसस्थानकाची दुरवस्था;

## प्रवाशांचे हाल कायम, काम ८ वर्षांपासून रखडले

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी शहरातील मध्यवर्ती बसस्थानकाची अवस्था दिवसेंदिवस गंभीर होत चालली असून, प्रवाशांना मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागत असल्याचे चित्र आहे. २०१८ मध्ये नवीन बसस्थानक इमारतीचे काम मोठ्या थाटामाटात सुरू करण्यात आले होते. मात्र तब्बल आठ वर्षे उलटूनही हे काम अपूर्ण अवस्थेतच असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. बसस्थानक परिसरात सध्या अस्वच्छता, दुर्गंधी आणि देखभालीचा अभाव स्पष्टपणे दिसून येतो. काही ठिकाणी कचर्याचे ढीग साचले असून, परिसरात जनावरांचा वावर असल्याने प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. पिण्याच्या पाण्याची सोय नसणे, तसेच स्वच्छतागृहांची दुरवस्था यामुळे विशेषतः महिला प्रवाशांची गैरसोय अधिक वाढली आहे. प्रवाशांच्या म्हणण्यानुसार, बसस्थानक परिसरात उघड्यावर नैसर्गिक विधी करण्यास भाग पडणारी परिस्थिती निर्माण झाली असून, ही बाब आरोग्यदृष्ट्याही गंभीर ठरू शकते. धूळ आणि अस्वच्छतेमुळे श्वसनाचे त्रास होण्याचा धोका वाढत असल्याचेही नागरिक सांगतात. २०१८ मध्ये सुरू झालेले हे काम पुढील काही वर्षांत विविध टप्प्यांवर रखडले. दरम्यानच्या काळात वेगवेगळ्या लोकप्रतिनिधींच्या कार्यकाळातही प्रकल्प पूर्णत्वास न गेल्याने स्थानिक नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. २०२४ नंतर कामात काही प्रमाणात हालचाल दिसत असली तरी आठ वर्षांचा विलंब हा प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा असल्याचे मत व्यक्त होत आहे. स्थानिक नागरिकांकडून आमदार आणि प्रशासनाकडे तातडीने हस्तक्षेप करून निधी उपलब्ध करणे, ठेकेदार व संबंधित अधिकार्यांची जबाबदारी निश्चित करणे आणि बसस्थानकाचे काम युद्धपातळीवर पूर्ण करणे अशी मागणी केली जात आहे. तसेच बसस्थानक परिसरात सुरू असल्याचा नागरिकांचा आरोप असलेल्या ▶ उर्वरित पान २ वर

# वडवणी शहरात 'डॉ. सोनाजीराव रांजवण माध्यमिक विद्यालया'चा दबदबा कायम

### प्रतिज्ञा सिद्धेश्वर कवचट ९५.६०% गुणांसह शहरात पहिली ; निकालाची परंपरा राखली

**वडवणी । प्रतिनिधी**

येथील डॉ. सोनाजीराव रांजवण माध्यमिक विद्यालयाने आपल्या यशाची देदिप्यमान परंपरा यंदाही कायम राखली आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या माध्यमिक शालांत परीक्षा (डडउ) निकालात या विद्यालयाने गुणानुक्रमे वडवणी शहरात प्रथम क्रमांक पटकावून आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. निकालाचे ठळक पैलू: विद्यालयाचा एकूण निकाल ८६.३४% लागला असून, परीक्षेस बसलेल्या २९३ विद्यार्थ्यांपैकी २५३ विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. निकालाचे सविस्तर वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे. विशेष प्राविण्य: ६० विद्यार्थी

प्रथम श्रेणी: ९२ विद्यार्थी, द्वितीय श्रेणी: ७४



विद्यार्थी, तृतीय श्रेणी: २७ विद्यार्थी

गुणवंत विद्यार्थ्यांची चमक: तालुक्याच्या गुणवत्ता यादीत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी वरचा क्रमांक पटकावला आहे. यामध्ये:

१. कु. प्रतिज्ञा सिद्धेश्वर कवचट हिने ९५.६०% गुण मिळवून शहरात प्रथम येण्याचा बहुमान मिळवला. २. कु. सानिका भालचंद्र बावधाने हिने ९४.८०% गुणांसह द्वितीय क्रमांक पटकावला. ३. चि. आगम धन्यकुमार जगजीवन याने ९३% गुण मिळवून तृतीय क्रमांक संपादन केला.

सर्वत्र कौतुकाचा वर्षाव: विद्यालयाच्या या दैदिप्यमान यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माननीय श्री. शिवाजीभाऊ रांजवण साहेब व सचिव माननीय श्री. प्रतापभैय्या रांजवण साहेब यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या या यशात मुख्याध्यापक श्री. वाय. बी. भोसले, पर्यवेक्षक श्री. जयदेव लांडे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या यशामुळे परिसरातून व पालकांमधून डॉ. सोनाजीराव रांजवण विद्यालयावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

### शुभ्रा मधुकर आमटे हिचे १० वी च्या परीक्षेत यश

**बीड । प्रतिनिधी**

खांडे पारगाव येथील खांडे पारगाव हायस्कूल या शाळेची विद्यार्थिनी कुमारी शुभ्र मधुकर आमटे हिने दहावीच्या परीक्षेमध्ये ८९.४०% गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तिच्या या यशामुळे शाळा, पालक व परिसरातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. शुभ्रा हिने सातत्यपूर्ण अभ्यास, मेहनत आणि जिद्दीच्या बळावर हे यश मिळवले आहे. तिच्या या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद तसेच ग्रामस्थांनी तिचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. कुमारी शुभ्रा मधुकर आमटे हिच्या उज्ज्वल भविष्यासाठी सर्व स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.